# प्रकरण- 4

# टिळक युग (1905-1920)

**प्रस्तावना :**

भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना 28 डिसेंबर, 1885 रोजी झाली. स्थापनेपासून म्हणजेच 1885 ते 1905 या कालावधीत राष्ट्रसभेचे नेतृत्व फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, गोपाळकृष्ण गोखले यासारख्या मवाळवादी नेत्यांनी केले. म्हणून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या या कालखंडाला मवाळवादी/ नेमस्ताचा कालखंड असे संबोधले जाते. 1885 पासून भारतीय राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी केलेल्या अर्ज, विनंत्या, निवेदने, शिष्टमंडळांचा व सनदशीर मार्गांचा ब्रिटिशांवर कोणत्याही प्रकारे परिणाम झाला नाही. राष्ट्रसभेच्या मवाळांनी इंग्रजी सत्तेचे उच्चाटन जरी केले नसले तरी त्यासाठी आवश्यक ते वातावरण निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. सर्व देशभर देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, स्वाभिमान व देशासाठी त्याग करण्याची प्रेरणा जनतेमध्ये निर्माण करण्याचे काम केले. थोडक्यात, मवाळांनी केलेल्या कार्यामुळेच भारतात संघटितरीत्या स्वातंत्र्य चळवळीचा पाया घातला गेला.

ब्रिटिशांच्या भारतीय प्रश्नांबाबतीतील उदासीनतेमुळे भारतातील नवशिक्षित मध्यमवर्गीय तरुणांमध्ये ब्रिटिशांविरुद्ध जहालवादी भावना निर्माण झाली. शेवटी 1907 साली सुरत येथील काँग्रेसच्या अधिवेशनात मध्ये जहाल व मवाळ यांच्यात मतभेद होऊन जहालवादी गट काँग्रेस च्या बाहेर पडला. जहाल व मवाळ यांच्यात निर्माण झालेली दरी ही कॉंग्रेस च्या विविध अधिवेशनामधून वाढत गेली व शेवटी सुरत अधिवेशनामध्ये तिचे विभाजन झाले. 1905 ते 1920 या कालखंडात राष्ट्रीय सभेमध्ये जहालवादी विचाराने ब्रिटिशांच्या एकाधिकारशाहीला, प्रशासकीय अनैतिकतेला वाचा फोडण्याचे काम केले. म्हणूनच या कालखंडाला जहालवादी कालखंड असे संबोधले जाते.

**1905 चे कॉंग्रेस चे अधिवेशन: (बनारस)**

28 डिसेंबर 1885 रोजी मुंबईतील तेजपाल संस्कृत विद्यालयात काँग्रेसची स्थापना झाली तेव्हा देशभरातून जमलेल्या एकूण 72 लोकांपैकी काशी नगरीचे प्रतिनिधित्व निवृत्त दिवाणी न्यायाधीश ‘रामकली चौधरी’ यांनी केले होते. ते संस्थापक मंडळ सदस्यांपैकी एक होते. रामकली बाबूंच्या अथक परिश्रमाने बनारसमध्ये काँग्रेसचा पाया घातला गेला. त्या काळात वाराणसीतील त्यांच्या राजकीय साथीदारांमध्ये वसीउद्दीन मुख्तार, छनू लाल, मुन्शी माधव लाल, उपेंद्रनाथ बसू, वृंदावन वकील इत्यादींचा समावेश होता .

काँग्रेसच्या स्थापनेने राजकीय संस्थांच्या निर्मितीची सुरुवात झाली . बनारस येथील कॉंग्रेसचे हे एकविसावे अधिवेशन होते; ज्यामध्ये गोपाळकृष्ण गोखले यांच्या नेतृत्वाखालील बनारस राष्ट्रीय चळवळीला एक युगप्रवर्तक असे वळण मिळाले. कॉंग्रेसच्या राष्ट्रीय व्यासपीठावर प्रथमच 'स्वराज्याची' मागणी करून आंदोलनाला एक निश्चित उद्दिष्ट दिले गेले.

1905 मध्ये प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारतात संभाव्य आगमनाशी संबंधित एक ठराव उदारमतवाद्यांनी जहालांच्या विरोधाला न जुमानता संमत केला. या अधिवेशनाद्वारे बंगालचे विघटन करणाऱ्या ब्रिटिश सत्तेला 'क्रूर' ठरवून त्यांच्याकडून सहकार्याच्या शक्यताही सोडून दिल्या गेल्या. स्वराज्याच्या ध्येयासाठी राजकीय शस्त्र म्हणून 'स्वदेशी'ला तत्वतः संमती मिळाली. तसेच जहाल आणि मवाळ यांच्यातील संघर्षाची भीती समन्वयात बदलली. राजघाटावर झालेल्या या अधिवेशनात स्वागताध्यक्ष मुन्शी माधवलाल होते तर संयोजनामध्ये बाबू शिवप्रसाद गुप्ता, बाबू विष्णुराव पराडकर आणि बैजनाथ सिंग आदींनी मोलाचे योगदान दिले.

**1906 चे कॉंग्रेस चे अधिवेशन: (कलकत्ता)**

काँग्रेसचे कलकत्ता अधिवेशन 1906 मध्ये कलकत्ता (सध्याचे कोलकाता) येथे पूर्ण झाले. या अधिवेशनात मवाळ पक्ष आणि जहाल पक्ष यांच्यातील मतभेदांमुळे पुढच्याच वर्षी 1907 च्या सुरत अधिवेशनात काँग्रेसचे दोन तुकडे झाले आणि मावळांनी काँग्रेसचा ताबा घेतला. 1906 च्या कलकत्ता अधिवेशनावेळी मवाळ आणि जहाल पक्षांमध्ये बरेच वैचारिक भेद निर्माण झाले होते. अशा परिस्थितीमध्ये जहालवाद्यांना बाळ गंगाधर टिळक अधिवेशनाचे अध्यक्ष व्हावेत अशी इच्छा होती . परंतु उदारमतवाद्यांनी दादाभाई नौरोजींना इंग्लंडहून बोलावून काँग्रेसच्या 'कलकत्ता अधिवेशना'चे अध्यक्ष केले. दादाभाई नौरोजींच्या सक्षम नेतृत्वामुळे काँग्रेसमधील फूट वाचली. मतभेद संपले नाहीत तर ते दबले गेले. असे असले तरी कॉंग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनामध्ये स्वराज्यप्राप्ती, राष्ट्रीय शिक्षणाचा अवलंब, स्वदेशी चळवळीला प्रोत्साहन, व विदेशी कपड्यांवर बहिष्कार या तत्वांचा पुरस्कार केला. दादाभाई नौरोजींनी स्वराज्याची मागणी सर्वप्रथम कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनात केली . येथे 'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ ऑस्ट्रेलिया आणि कॅनडाच्या ब्रिटिश वसाहतींच्या धर्तीवर ब्रिटिश सार्वभौमत्वात 'स्वराज्य' असा आहे.

**1907 चे कॉंग्रेस चे अधिवेशन: (सुरत)**

26 डिसेंबर 1907 रोजी ताप्ती नदीच्या काठावर राष्ट्रीय कॉंग्रेसचे सूरत अधिवेशन संपन्न झाले; जे ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचे मानले जाते. कारण स्वराज्यप्राप्तीसाठीच्या चळवळीचा मार्ग आणि अध्यक्षपदाची निवड या दोन्ही कारणांमुळे मवाळ व जहाल पक्षांमध्ये या अधिवेशनात काँग्रेसचे दोन भाग झाले व यानंतर 1916 च्या लखनौ अधिवेशनात दोन्ही पक्ष एकमेकांत विलीन झाले.

जहालवाद्यांना 1907 साली कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन नागपुरात घ्यायचे होते आणि त्यांना बाळ गंगाधर टिळक किंवा लाला लजपतराय अध्यक्ष करायचे होते, परंतु मवाळवाद्यांनी हे अधिवेशन सुरतमध्ये आयोजित केले आणि त्यांनी स्थानिक नेत्याला अध्यक्ष बनवण्यास नकार दिला. परंतु उदारमतवादी पक्षाने डॉ. रासबिहारी घोष यांना संमेलनाचे अध्यक्ष केले. अधिवेशनापूर्वी दोन्ही पक्षांमध्ये तुंबळ हाणामारी झाली, परिणामी काँग्रेसचे जहाल आणि मवाळ असे दोन तुकडे झाले. व एकाच ठिकाणी जहाल व मवाळांची दोन अधिवेशने स्वतंत्ररीत्या पार पडली . ॲनी बेझंट म्हणाल्या, "सुरतची घटना काँग्रेसच्या इतिहासातील सर्वात दुःखद घटना आहे." यानंतर 1916 मध्ये काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनात दोन्ही पक्ष पुन्हा एकत्र आले. प्रमुख जहाल नेते बाळ गंगाधर टिळक यांना इंग्रजांनी अटक करून मंडाले (ब्रह्मदेश) तुरुंगात पाठवले, त्यामुळे जहालवादी चळवळ काही काळ कमकुवत झाली, परंतु 1914 मध्ये बाळ गंगाधर टिळक तुरुंगातून परतल्यावर पुन्हा ही चळवळ पुन्हा नव्या जोमाने सुरू झाली.

**जहालवादाचा उदय :**

19 व्या शतकाच्या शेवटच्या दशकामध्ये राष्ट्रीय सभेमध्ये अनेक तरुण नेतृत्व उदयास येऊ लागले. तथापि राष्ट्रीय सभेची सूत्रे या वेळी मवाळ नेत्यांच्या हाती होती. मवाळ नेते हे विद्वान उत्कृष्ट वक्ते होते. परंतु ब्रिटिशांबद्दलच्या त्यानी अवलंबलेल्या सनदशीर मार्गाच्या ऐवजी नवा कार्यक्रम व कृतिशीलता राष्ट्रसभेला आवश्यक होती. या दृष्टीने हळूहळू राष्ट्रीय सभेत जहालवादाच्या रूपाने एक वेगळा विचारप्रवाह उदयास आला. लोकमान्य टिळकांच्या मते, “चळवळीचे चटके बसल्या शिवाय ब्रिटिश सत्ता वितळणार नाही.” मवाळवादी नेते राजनिष्ठा, कायदा व शांतता या चौकटीबाहेर पडू इच्छित नव्हते म्हणूनच जहाल नेत्यांनी लोकजागृतीचे कार्य हाती घेतले व सर्वसामान्यांचा काँग्रेसमधील सहभाग वाढवून काँग्रेसला अधिक कृतीशील बनवले.

लोकमान्य टिळकांनी भारतीय जनतेमध्ये लढाऊ राष्ट्रवाद निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. त्यांची ही विचारसरणी जहाल मानली जाऊ लागली. देश प्रेमाने ओथंबलेले त्यांचे शब्द लोकांच्या अंतकरण आला जाऊन भिडत असत. त्यांनी तरुणांमध्ये राष्ट्रप्रेम, स्वाभिमान व नवचैतन्य निर्माण केले. या प्रसंगी त्यांना बंगालमध्ये अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, पंजाबमध्ये लाला लजपतराय हे सहकारी मिळाले. याशिवाय पंडित मदनमोहन मालवीय, दादासाहेब खापर्डे, बापुजी अणे इत्यादी अनेक समर्थक टिळकांना लाभले.

**भारतामध्ये जहालवादाच्या उदयाची कारणे:**

1.1892 च्या कायद्याने केलेली निराशा :

ब्रिटिशांच्या न्याय बुद्धीवर व लोकशाहीवर भारतीय मवाळवादी नेत्यांचा पूर्ण विश्वास होता. भारतीयांना राजकीय सुधारणा मिळतील, शासनामध्ये भारतीयांना सहभागी केले जाईल. या विश्वासाने भारतीय असताना 1892 चा भारत सुधारणा कायदा पारित करण्यात आला. परंतु या द्वारे प्रत्यक्ष जबाबदार शासन पद्धतीची स्थापना झाली नाही. यामुळे नेमस्तवादी नेत्यांनाही ब्रिटिशांच्या या वागणुकीचा संताप आला. जहालवाद्यांनी नेमस्ताच्या या सौम्य धोरणावर टीका सुरू केली. यामुळे जनतेला जहालवादी विचारसरणीचे गरजेची वाटू लागली.

2. मवाळाच्या कार्यपद्धतीवर/ कार्यप्रणालीवर टीका:

उदारमतवादी /नेमस्तानी राष्ट्रीय सभेच्या व्यासपिठावर वेळोवेळी ब्रिटिशांबद्दल असलेली आपली निष्ठा व्यक्त केली. अर्ज, विनंत्या व सनदशीर मार्गाने आपल्या मागण्या ब्रिटिशांना समोर मांडल्या. परंतु ब्रिटिशांनी या मागण्यांना केराची टोपली दाखवली. राजकीय हक्क आपोआप मिळत नसतात तर त्यासाठी मोठा लढा द्यावा लागतो व संघर्ष करावा लागतो असे जहालवादी तरुणांना वाटत होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनातून काहीही साध्य होणार नाही जोपर्यंत कांग्रेस आपली विचारसरणी जहाल बनवत नाही, अशी सर्वसामान्यांची विचारधारा बनल्याने काँग्रेसला दिवसेंदिवस आक्रमक बनत जावे लागले व यातूनच जहालवादाचा उदय झाला.

3. आंतरराष्ट्रीय घडामोडी:

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवर होणारा ब्रिटिशांचा अत्याचार पाहून सुशिक्षित भारतीयांची मने इंग्रजांबद्दल प्रक्षुब्ध झाली. 1891 साली आफ्रिका खंडातील ॲबेसीनियाने इटालीचा मोठा पराभव केला. 1904 मध्ये पूर्वेकडील जपानने पश्चिमेकडील युरोपमधील रशिया सारख्या बलाढ्य शक्तीचा पराभव केला. त्यामुळे पूर्वेकडील देशात नवचैतन्याचे वारे वाहू लागले. यासारख्या आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव भारतीयांवर झाला. संघटितरित्या प्रतिकाराद्वारे ब्रिटिश सत्ता उलथवून लावता येईल असे भारतीयांना वाटून त्यामध्ये जहालवाद निर्माण झाला.

4. भारतीयांची आर्थिक पिळवणूक:

Dr. S. R. Kathmani History of Modern India

1757 ते 1857 या शंभर वर्षांच्या काळात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांविरुद्ध केलेल्या  विविध शोषणामुळे कंपनी विरुद्ध 1857 साली उठाव झाला. ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या नव्या व्यापार व उद्योग धोरणामुळे भारतीय उद्योग धंदे डबघाईला आले. भारतीय हस्तोद्योग व कुटीर उद्योग यांचा ऱ्हास झाला. भारत ही फक्त कच्चामाल निर्यात करणारी ब्रिटिशांची एक प्रमुख वसाहत बनली. भारतीयांवर विविध प्रकारचे कर व जकात बसवून ब्रिटिशांनी भारतीयांची अर्थव्यवस्था खिळखिळी करून टाकली. दादाभाई नौरोजी , दिनेश भाई वाच्छा, न्या.  रानडे  व रमेशचंद्र दत्त या सारख्या आर्थिक विचारवंतांनी अभ्यासपूर्ण लिखाण करून ब्रिटिशांच्या या भारतीय आर्थिक शोषणाबाबतचे सटीक लिखाण केले. नौरोजी यांनी "द पावर्टी अँड अन ब्रिटिश रुल इन इंडिया" मधून आपला सुप्रसिद्ध आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत मांडला. यामुळे भारतीयांना ब्रिटिशांच्या या गैरवर्तणूकीची घृणा निर्माण होऊन जहालमतवादाच्या वाढीस पोषक परिस्थिती निर्माण झाली.

5. दुष्काळ व साथीच्या रोगांच्या वेळी शासनाची उदासीनता:

प्राचीन काळापासून भारताचा प्रमुख व्यवसाय शेती असल्याने भारताची अर्थव्यवस्था शेती व शेतीशी संबंधित उद्योगांवर आधारित होती. ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतीय कृषी व्यवस्थेत व महसूलप्रणालीत  बदल झाले होते. परंतू भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून असल्याने, नैसर्गिक अनियमिततेमुळे भारतीय शेतीवर विविध संकटे कोसळत होती.  दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे जीवन जगणे असह्य झालेले असताना ब्रिटिश शासनाने मात्र तुटपुंज्या मदतीद्वारे दुष्काळ निवारणाचे प्रयत्न केले. त्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात भारताच्या अनेक भागात शेतकऱ्यांचे उठाव झाले. याच दरम्यान प्लेग व साथीच्या रोगांनी थैमान घातल्याने लाखो भारतीयांचा बळी गेला. महाराष्ट्रात प्लेग निवारणासाठी आलेल्या मिस्टर रँड व आयर्स्ट यांचा खुन चाफेकर बंधूनी केला. या असंतोषातूनच भारतीय जहालवादाची निर्मिती झाली असे म्हणावे लागेल.

6. जहाल राष्ट्रवादाच्या निर्मितीतील वृत्तपत्रांचे योगदान:

महाराष्ट्रातील जहालमतवादाच्या उदयामध्ये वर्तमानपत्राचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे . पुण्याच्या सार्वजनिक सभेने ब्रिटिशांच्या अन्यायी व जुलमी वागणुकीचे प्रकट चित्र समाजासमोर केले. महाराष्ट्रामध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमालेने'  व  लोकहितवादींच्या 'शतपत्रांनी' ब्रिटिशांविरोधी जनमत निर्माण केले. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या अनैतिक व चुकीच्या धोरणांवर कडाडून टीका केली. त्यामुळे भारतीय तरुणांमध्ये क्रांतीची बीजे पेरली गेली व राष्ट्रभक्तीचे स्फुल्लिंग निर्माण झाले.

बंगालमध्ये संध्या, युगांतर, हिंदू पेट्रीयट, अमृतबझार पत्रिका व बंगाली या वृत्तपत्रानी जहालवादास खतपाणी घातले. बिपिनचंद्रपाल यांनी 'न्यू इंडिया' वृत्तपत्रातून ब्रिटिश सरकार व व काँग्रेस व कठोर हल्ले केले. लाला लजपत राय यांनी 'ट्रिब्यून' या वृत्तपत्राद्वारे जहालवादी राष्ट्रवादाचा संदेश पंजाबी तरुणांपर्यंत पोहोचविला. एकूणच वृत्तपत्रांनी निर्माण केलेल्या असंतोषामुळे भारतीय तरुणांच्या मनात जहालवाद निर्माण झाला.

7. लॉर्ड कर्जनचे जुलमी व अन्यायी धोरण:

1899 ते 1905 या कालखंडामध्ये लॉर्ड कर्जन हा अतिशय महत्त्वकांक्षी, वंशश्रेष्ठी व कट्टर साम्राज्यवादी विचारसरणीच्या गव्हर्नर जनरलने आपल्या अन्यायी व दडपशाहीच्या कृत्याने भारतीयांमध्ये असंतोष निर्माण केला. त्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारावर सरकारचे कडक नियंत्रण प्रस्थापित केले. 1899 च्या कलकत्ता कार्पोरेशन ॲक्टनुसार सभासदांची संख्या 75 वरून कमी करून 50 केली व सरकारी सभासदांच्या संख्येत वाढ केली. 1904 च्या विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाच्या कारभारावरही शासकीय नियंत्रण प्रस्थापित केले. भारतातील सनदी अधिकाऱ्यांच्या उच्च पदाच्या नोकऱ्या फक्त इंग्रजांना दिल्या पाहिजेत असे पक्षपाती व चुकीचे विचार त्यांनी मांडले. नामदार गोखले व लाला लजपतराय या भारतीय राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी कर्जनची भेट घ्यायला गेल्यावर कर्झनने ती उद्दामपणे नाकारली. यामुळे भारतीय तरुणांच्या मनामध्ये ब्रिटिशसत्तेविरुद्ध असंतोष निर्माण होण्यास मदत झाली.

8.  सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे योगदान:

ब्रिटिशांनी दिलेल्या आधुनिक शिक्षणाने भारतीयांना पाश्चात्य ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान यांच्याशी ओळख घडवून दिली. पाश्चात्त्य देशात घडलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींचा प्रभाव पडल्याने भारतातील मध्यमवर्गीय बुद्धिजीवी वर्गामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळींना सुरुवात झाली. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन व थिऑसॉफिकल सोसायटी या सामाजिक सुधारणा चळवळीतील संघटनांनी भारतीयांच्या मनामध्ये राष्ट्रीयत्वाची, स्वत्वाची व स्वाभिमानाची ज्योत पेटवली. हिंदू धर्म व संस्कृतीपासून भारतीय नेत्यांना प्रेरणा मिळाली. विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे भारतीयांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. एकंदरीत या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन भारतामध्ये जहालवादाच्या निर्मितीला प्रोत्साहन लाभले.

9. बंगालची फाळणी:

भारतामध्ये जहालवादाच्या उदयास कारणीभूत ठरणारी महत्त्वपूर्ण घटना म्हणजे ब्रिटिशांनी केलेली बंगालची फाळणी होय. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्त्वाची घटना म्हणून बंगालच्या फाळणीकडे पाहिले जाते. कारण या घटनेने ब्रिटिश भारतातील तमाम नागरिकांना ब्रिटिश

Dr. S. R. Kattimani History of Modern India

सत्तेचे खरे स्वरूप समजले व भारतीयांच्या एकीचे प्रत्यय पाहायला मिळाले. बंगालच्या फाळणीची योजना 1903 मध्ये बंगालचा लेफ्टनंट गव्हर्नर सर अॅड्रयू फ्रेझरने लॉर्ड कर्जनच्या आदेशाने तयार केली. डिसेंबर 1903 मध्ये सरकारच्या प्रसिद्धीपत्रकात ती प्रसिद्ध करण्यात आली. 16 ऑक्टोबर, 1905 रोजी लॉर्ड कर्जनने बंगालची फाळणी 'बंगाली व गैर बंगाली' अशी न करता 'हिंदू - मुस्लीम समुदायांवर' आधारित केले. मवाळवाद्यांनी या विरोधात ब्रिटिश सरकार विरोधी आंदोलन सुरू केले.

10. लाल-बाल-पाल यांचे नेतृत्व :

ब्रिटिशांनी 1885 ते 1905 या काळात भारतातील जनतेचे आर्थिक व राजकीय शोषण केल्याने त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या. भारतीय राष्ट्रसभेने भारतीयांच्या समस्या व अडचणी अर्ज व विनंत्यांच्या सनदशीर मार्गाने ब्रिटिशांपुढे मांडल्या. परंतु ब्रिटिशांनी त्यांची पर्वा न करता राष्ट्रसभेचा व मवाळ नेत्यांचा वेळोवेळी अपमान केला. ब्रिटिशांना त्यांच्याच पद्धतीने भारतीयांची ताकत सभा, मोर्चे, निदर्शने, हरताळ व असहाकाराद्वारे लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल व लोकमान्य टिळक यांनी केला. या तीन जहाल नेत्यांनी जनतेच्या ब्रिटिशांबद्दलच्या भारतीयांच्या बदलत्या जनमताला लक्षात घेवून व त्याच्या असंतोषाला वाचा फोडण्याचे काम केले. थोडक्यात, लाल- बाल- पाल या तीन जहाल विचारसरणीच्या नेतृत्त्वामुळे भारतात जहालवाद मोठ्या प्रमाणात पसरण्यास मदत झाली.

**जहालवादाचे मूल्यमापन:**

लोकमान्य टिळक जहालवादाबद्दल म्हणतात, "आमच्या धोरणाबद्दल मवाळ गट आणि जहाल गट हे दोन नवे शब्द वापरले जात आहेत. हे शब्द काळाशी संबंधित आहेत. त्यामुळे ते काळाबरोबर बदलतील. कालचे जहाल आज मवाळ बनले त्याप्रमाणे आजचे जहाल उद्या मवाळ बनतील."

संपूर्ण स्वातंत्र्याचे उद्दिष्ट आणि त्यासाठी व्यापक जनआंदोलनाचा मार्ग जहालवाद्यांनी स्वीकारला. राष्ट्रीय जनजागृतीची मोहीम सुशिक्षित मध्यमवर्गीयांपासून बहुजनसमाजापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य जहालांनी केले. जहाल नेत्यांनी विद्यार्थी, शेतकरी, कामगार व मजूर यांचे राष्ट्रीय आंदोलनासाठीचे महत्त्व ओळखले. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती सारखे उत्सव साजरे करून लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता व आपलेपणाची भावना निर्माण केली. थोडक्यात, जहालवादी नेत्यांनी भारताच्या आधुनिक राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली.

**<u>बंगालची फाळणी :</u>**

19 व्या शतकाच्या शेवटी बंगाल प्रांतात आसाम, बिहार आणि ओरिसा यांचा समावेश होता. त्यावेळी त्याचे क्षेत्रफळ 1,89,000 चौरस मैल आणि लोकसंख्या 8  कोटी इतकी होती.

लॉर्ड कर्झनने 20 जुलै 1905 रोजी बंगालच्या फाळणीची घोषणा केली. त्याची अंमलबजावणी 16 ऑक्टोबर 1905 पासून झाली. गव्हर्नर जनरल असलेल्या लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीला 'प्रशासकीय सीमांचे पुनर्नीर्धारण' असे कारण दाखवले. थोडक्यात, प्रशासकीय गैरसोयीचे सबब मांडून वाढत्या बंगाली राष्ट्रवादाला छेद देण्यासाठी हिंदू आणि मुस्लिम यांना विलग पडण्यासाठी बंगालच्या फाळणीची योजना केली. या अंतर्गत पूर्व बंगाल आणि आसाम यांना जोडून एक नवीन प्रांत तयार करण्यात आला, ज्याला पूर्व बंगाल असे म्हणतात.

पूर्व बंगाल हा मुस्लीम बहुसंख्य प्रांत ज्याची राजधानी ढाका ठेवण्यात आली . याचे क्षेत्रफळ  1,06,540 चौरस मैल व लोकसंख्या  3 कोटी 20 लाख इतकी होती . ज्यामध्ये मुस्लिम लोकसंख्या 1 कोटी 80 लाख तर हिंदुंची लोकसंख्या 1 कोटी 20 लाख इतकी होती.

बंगालचा पश्चिम भाग, बिहार आणि ओरिसा यांना जोडून पश्चिम बंगालची निर्मिती झाली. पश्चिम बंगालचे क्षेत्रफळ 1,41,580 चौरस मैल व  एकूण लोकसंख्या  5 कोटी 40 लाख इतकी होती. ज्यामध्ये हिंदूंची लोकसंख्या 4 कोटी 20 लाख व मुस्लिमांची लोकसंख्या 90 लाख इतकी होती. पश्चिम बंगाल प्रांताचे मुख्यालय पूर्वीप्रमाणेच कलकत्ता येथे ठेवले .

बंगालच्या फाळणीच्या निषेधार्थ 7 ऑगस्ट 1905 रोजी कलकत्त्याच्या 'टाऊन हॉल' मध्ये बंगालच्या विसर्जनाचा ठराव मंजूर करण्यात आला. यामुळे राष्ट्रवादी जनतेमध्ये व नेत्यांमध्ये तीव्र नाराजीच्या प्रतिक्रिया उमटल्या आणि 16 ऑक्टोबर हा दिवस बंगालमध्ये शोक दिन म्हणून पाळण्यात आला. बंगालची फाळणी रद्द होईपर्यंत स्वदेशीचा वापर आणि विदेशी वस्तूंवर बहिष्कार सुरूच ठेवण्याचा निर्धार केला गेला. बंगालमध्ये वंगभंग आंदोलनाचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी, बिपिनचंद्र पाल आणि अरविंद घोष यांनी केले. लोकांनी उपवास करून गंगेत स्नान केले आणि एकतेचे प्रतीक म्हणून एकमेकांना राख्या बांधल्या. सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणाले की, "बंगालच्या विभाजनाची घोषणा आमच्यावर बॉम्बगोळ्यासारखी कोसळली. बंगालची फाळणी म्हणजे आमच्या अस्मितेला हेतुपुरस्सर सरकारने धक्का दिला." यावरून मवाळांच्या मार्गाचा ब्रिटिशांवर काहीही परिणाम होत नव्हता हे सिद्ध झाले. परंतु लवकरच फाळणी विरोधी वंगभंग आंदोलनाने संपूर्ण भारतभर ब्रिटिशांविरोधी असंतोषाची लाट निर्माण झाली.

**फाळणी विरोधी वंगभंग आंदोलन :**

Dr. S.R. Kattimani History of Modern India

भारतीय समाजमनाच्या भावनांची पर्वा न करता ब्रिटिशांनी बंगालची फाळणी केली. या फाळणीला विरोध करण्यासाठी वंगभंग आंदोलन बंगालमध्ये सुरु झाले. वंगभंग आंदोलनाच्या वेळी बंगालमध्ये राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळा, महाविद्यालयांची व शैक्षणिक संस्थांची निर्मिती करण्यात आली. ब्रिटिशांनी सुरू केलेल्या सरकारी शाळा, कॉलेज व न्यायालयावर बहिष्कार टाकण्यात आला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केली. बंगालमधील जहाल नेते बाबू अरविंद घोष यांची पुणे, मुंबई, नाशिक व धुळे या ठिकाणी व्याख्याने झाली. राष्ट्रातील खरे खोटे दुर्गुण व दोष सदैव उगाळत न बसता राष्ट्रात स्वाभिमान, सामर्थ्य व श्रेष्ठतेचा विश्वास निर्माण करून लोकांना राष्ट्रकार्यासाठी प्रवृत्त करणे हा त्यांच्या व्याख्यानाचा आशय होता.

वंगभंग आंदोलनामध्ये बंगालमधील काही सामाजिक संस्था व वृत्तपत्रांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. ब्रिटिश इंडिया असोसिएशन, जमीनदार संघ, वंदे मातरम संप्रदाय, अँटी सिक्युलर सोसायटी, स्वदेशी समाज व सतीशचंद्र  मुखर्जींची 'डॉन सोसायटी' इत्यादी अनेक संस्थांनी सभा, संमेलने, मिरवणुका, निदर्शने, हरताळ व मोर्चा इत्यादी मार्गाने आंदोलनाची तीव्रता वाढवली. बंगालच्या फाळणी विरोधी राष्ट्रसभेने स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व  स्वराज्य या चतुसूत्रीचा वापर केला.

**स्वदेशी:**

ब्रिटिश काळात भारताची आर्थिक परिस्थिती चांगली होती परंतु त्याच्या विकासाची फळे भारतीयांना मात्र मिळत नव्हती. इंग्लंडमधून येणारा पक्का माल व भारतातील ब्रिटिश भांडवल यामुळे भारतीय उद्योगधंद्याचा व्हावा तेवढा विकास होत नव्हता. त्यावर स्वदेशीचा म्हणजेच भारतात तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर हा अत्यंत प्रभावी उपाय होता. लोकहितवादी म्हणजेच गोपाळ हरी देशमुख यांनी सर्वप्रथम स्वदेशीचा पुरस्कार केला. बहिष्कार ही स्वदेशीची दुसरी बाजू होती. पुढे परदेशी मालावर बहिष्कार हेच प्रभावी राजकीय हत्यार बनले.

स्वदेशी व बहिष्कार या संकल्पनांचा वापर ब्रिटिशांविरोधात देशी उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी महाराष्ट्रात लोकहितवादी व न्यायमूर्ती रानडे यांनी तर बंगालमध्ये राजनारायण बसू व ठाकूर कुटुंबीयांनी केला होता. लोकमान्य टिळकांनी 1896 साली सर्वांगीण बहिष्काराची मोहीम चालवली होती. वंगभंग आंदोलनामध्ये भाग घेतानाच लोकमान्य टिळकांनी आपली सुप्रसिद्ध चतुःसूत्री जाहीर केली. टिळक म्हणत, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या तिन्हीचे मूळ ध्येय स्वराज्य मिळवणे हेच आहे. देशभर जाहीर सभांतून स्वदेशी व बहिष्काराचा संदेश देण्यात आला. हा संदेश दुहेरी होता. एका बाजूने सर्व परदेशी मालांची सार्वजनिक ठिकाणी होळी करायची व परदेशी वस्तू विकणाऱ्या दुकानांवर आंदोलने करायची तर दुसऱ्या बाजूने स्वदेशी मालांच्या उत्पादनाला व विक्रीला विशेष प्रोत्साहन द्यायचे. स्वदेशीच्या या संदेशाला भारताच्या सर्वच भागातून चांगला प्रतिसाद मिळाला.

**बहिष्कार:**

स्वदेशीचीच  दुसरी बाजू म्हणजे बहिष्कार होय. बहिष्कार म्हणजे कोणतीही विदेशी वस्तू न वापरणे होय. ब्रिटिशांना जागोजागी अडवून, प्रशासन चालवणे अशक्य करून सोडणे हे जहालांचे उद्दिष्ट होते. म्हणूनच न्याय, करवसुली, लष्कर, शांतता निर्मिती इत्यादी कार्यात सरकारला सहकार्य करायचे नाही असा निर्णय घेण्यात आला.

1905 साली ब्रिटिशांनी बंगालची फाळणी केल्यानंतर त्याविरुद्ध जनमत निर्माण करण्यासाठी जहालमतवाद्यांनी भाषणे, जनसेवा, घोषणापत्रे व बैठका यामार्गाद्वारे प्रखर राष्ट्रवादी चैतन्य बंगालच्या फाळणी विरोधी निर्माण केले. शहरी व ग्रामीण विद्यार्थी, महिला, शेतकरी, कामगार व युवक वर्ग जहालांच्या विचाराने प्रभावित झाले. स्वदेशीचा पुरस्कार व विदेशी वस्तूंवर बहिष्काराच्या घोषणेने एक नवीन चैतन्य राष्ट्रीय चळवळीस प्राप्त झाले. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी पुण्यामध्ये विदेशी कापडाची होळी आयोजित केली. तर हेच कार्य बंगालमध्ये स्वदेश बांधव समितीकडून केले गेले.

**राष्ट्रीय शिक्षण:**

ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या शाळांमधून ब्रिटिश साम्राज्य विस्तार व तो कसा दीर्घकाळासाठी आबादित राहील याची खबरदारी घेतली गेल्याने त्यातून राष्ट्रीय विचारसरणीने व राष्ट्रवादाने भारावलेली पिढी निर्माण होणे शक्य नसल्याचे तत्कालीन जहाल व मवाळ नेत्यांना वाटत होते .म्हणून त्यांनी राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या व भारताच्या सुजाण नागरिक निर्माण करणाऱ्या शाळांच्या स्थापनेमध्ये पुढाकार घेतला. वंगभंग आंदोलनावेळी भारताच्या विविध भागामध्ये अशा राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या शाळांची निर्मिती केली गेली. टिळकांच्या मते राष्ट्रीय शिक्षण म्हणजे राष्ट्रवादाने प्रेरित अशा भारतीय शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणे. पाश्चिमात्त्य आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली गुलामगिरीचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांचा भारतीयांनी त्याग करावा असे आवाहन टिळकांनी केले. शिक्षणात मातृभाषेला महत्व हवे असेही टिळकांचे आग्रही मत होते.

**स्वराज्य:**

Dr. S. R. Kattimani History of Modern India

ब्रिटिश सत्ता ही भारताच्या दारिद्र्याचे कारण म्हटल्यावर साहजिकच स्वराज्य हा त्या दारिद्र्यावरील उपाय बनला. सुरुवातीस मवाळांनी राज्यकारभारात सहभाग, आर्थिक बाबीवर नियंत्रण व खर्च कपात या मागण्या ब्रिटिशांकडे केल्या. परंतु पुढे जहालांच्या रेट्यामुळे मवाळांनीही स्वराज्याची मागणी केली.

याबाबतीत दादाभाई नौरोजीनी राष्ट्रीय सभेच्या कलकत्ता येथील अधिवेशनामध्ये सर्वप्रथम स्वराज्याची मागणी केली. परंतु येथे 'स्वराज्य म्हणजे स्वातंत्र्य नव्हे' हे लक्षात घेणे गरजेचे आहे. वसाहतीचे स्वातंत्र्य व साम्राज्यांतर्गत स्वातंत्र्य असे स्वराज्यास  म्हटले गेले. म्हणजे स्वराज्यात राज्याची सूत्रे स्वकीयांकडे असली तरी परराष्ट्रीय धोरण व आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंधावर साम्राज्यकर्त्या राष्ट्रांचे वर्चस्व हे मान्य असे.

वंगभंग आंदोलन दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने दडपशाहीचे धोरण अवलंबिले. परंतु जनतेच्या रेट्यापुढे ब्रिटिशांना नमते घ्यावे लागले. शेवटी 12 डिसेंबर 1911 रोजी दिल्ली येथे भरलेल्या दरबारात ब्रिटिश सम्राट पंचम जॉर्ज याने बंगालची फाळणी रद्द केल्याची घोषणा केली. अशा प्रकारे वंगभंग आदोलनामुळे  संघटीत राष्ट्रवादाचा प्रत्यय भारतीयांना आला. भारतात खरे प्रबोधन बंगालच्या फाळणीनंतरच झाले आणि त्यासाठी आपण लॉर्ड कर्झनचे अभिनंदन केले पाहिजे.कारण बंगालच्या फाळणीमुळेच भारतीयांना ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या नीतीची कल्पना आली व भारतामध्ये संघटीत राष्ट्रवाद निर्माण झाला.

**होमरूल चळवळ:**

वंगभंग आंदोलनाच्या यशस्वीतेनंतर राष्ट्रीय आंदोलनाचा मंदावलेला वेग पुन्हा गतिमान करण्यासाठी लोकमान्य टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीने दिलेले योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. 1914 ते 18 या काळात युरोपमध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. या काळात ब्रिटिशांकडून राजकीय मागण्या पूर्ण करून घेता येतील अशी धारणा लोकमान्य टिळकांची होती.  भारतीय स्वातंत्र्य चळवळीस नवचैतन्य निर्माण करण्याच्या लोकमान्य टिळकांच्या विचारांचे दृश्य स्वरुप म्हणजे होमरुल चळवळ होय. डॉ. ॲनी बेझंट, लोकमान्य टिळक व जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्त्वाखाली भारतात ही चळवळ घडून आली. होमरुल लीगच्या विविध संघटना भारतात अस्तित्वात आल्या. परंतु ही चळवळ मात्र एकच होती. होमरुल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य चळवळीस अधिक गतिमान करण्याचे काम केले. मुंबई, कानपूर, अलाहाबाद, कलकत्ता व मद्रास या ठिकाणी होमरुल लीगच्या संघटना स्थापन झाल्या होत्या.

**डॉ. ॲनी बेझंट:**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ॲनी बेझंट यांचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यांचा जन्म 1 ऑक्टोबर 1847 रोजी झाला. आपल्या  विचाराच्या प्रसारासाठी मद्रास येथे त्यांनी सन 1914 मध्ये 'कॉमन वील' हे साप्ताहिक व 'न्यू इंडिया' हे वृत्तपत्र सुरू केले. डॉ. ॲनी बेझंट यांनी भारतीय स्त्रियांचा दर्जा उंचावण्यासाठी कार्य केले. डॉ. बेझंट यांनी जवळपास 100 पुस्तके लिहून व जागोजागी अनेक व्याख्याने देऊन समाजप्रबोधनाचे कार्य केले.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्यकर्त्या ॲनी बेझंट यांनी आयर्लंड होमरूल लीगच्या आधारावर भारतात स्वशासन निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांच्या साह्याने 1916 मध्ये होमरूल लीगची स्थापना केली. लोकमान्य टिळकांनी आपले कार्यक्षेत्र म्हणून महाराष्ट्र, कर्नाटक आणि मध्य प्रांताची निवड केली. लोकांना राजकीय शिक्षण देणे, वाचनालयांची स्थापना करणे, वर्तमानपत्र, पत्रिका,  जनसभा व व्याख्यानाद्वारे जनजागृती करण्याची टिळकांची पद्धत होती.

**होमरुल चळवळीच्या उदयाची कारणे:**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये होमरुल चळवळीस महत्वाचे स्थान आहे. 1905 मध्ये बंगालच्या फाळणीनंतर भारतीयांचा असंतोष वंगभंग आंदोलनाच्याद्वारे प्रकट झाला. हिंदू-मुस्लीम एकीचे दर्शन झाल्याने ब्रिटिशानी या संघटीत राष्ट्रभावनेला आवर घालण्यासाठी फोडा आणि राज्य करा नीती अवलंबली . व्हाईसराय लॉर्ड मिंटो यांनी सिमला परिषदेद्वारे भारतात सांप्रदायिकतेला चालना दिली. व ब्रिटिशांच्या प्रोत्साहनातून सन 1906 मध्ये मुस्लीम लीगची स्थापना ढाका येथे झाली. राष्ट्रीय सभेपासून दूर राहण्यातच आपला स्वार्थ आहे, असे मुस्लिम नेत्यांना वाटत होते. 1909 च्या मोर्ले मिंटो सुधारणा कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ मिळाल्याने ब्रिटिशांप्रती मुस्लीम लीगला विश्वासाची व आपलेपणाची भावना निर्माण झाली. परंतु ब्रिटिश सरकारने सन 1911 मध्ये बंगालची फाळणी रद्द केल्याने स्वाभाविकच ब्रिटिशांनी आपले स्वप्न भंग केला आहे, असे मुस्लिम नेत्यांना वाटू लागले. 1908 ते 1914 अशी सहा वर्षे लोकमान्य टिळक हे ब्रह्मदेशातील मंडालेच्या कारावासात होते. या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस थंडावल्याचे व ज्यामध्ये मरगळ आल्याचे दिसून येते.

1914 साली टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर राष्ट्रीय चळवळीत त्यांनी नव्याने प्राण फुंकण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांनी राष्ट्रीय चळवळीला आलेली मरगळ झटकून टाकण्यासाठी व ती पुन्हा सक्रीय करण्यासाठी होमरूलद्वारे प्रयत्न सुरु केले. होमरूल चळवळीद्वारे अहिंसेचा वापर न करता ब्रिटिश सरकारकडून भारतीय वसाहतीला स्वराज्य द्यावे यासाठी प्रयत्न केले गेले. याप्रसंगी भारतीयांना राजकीय शिक्षण देऊन ब्रिटिश सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांनी भारतीय संसाधनांचा राजरोसपणे वापर केला आणि त्याची भरपाई

Dr. S. R. Katmani History of Modern India

करण्यासाठी भारतीयांवर भारी कर लादले गेले, परिणामी होमरूल लीग चळवळीत भारतीयांनी सक्रिय सहभाग घेतला. पहिल्या महायुद्धामुळे ब्रिटिश अजिंक्य असल्याचा भारतीयांचा भ्रम तुटल्याने ही चळवळ अतिशय सक्रिय बनली.

या काळात गोपाळकृष्ण गोखले व त्यानंतर 5 नोव्हेंबर 1915 रोजी फिरोजशहा मेहता यांचा मृत्यू झाला. मेहता मृत्यू पावल्यानंतर मुंबई इलाख्यातील मवाळ गटाचा मोठा आधार तुटला. जहालांच्या कॉंग्रेस प्रवेशाच्या मार्गातील मोठा अडसरही दूर झाला. ब्रिटिशांच्या धोरणावर नाराज असलेल्या मुस्लीम लीगनेही राष्ट्रीय सभेला सहकार्य करण्याचे मान्य केले होते. अशा सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर होमरुल चळवळीचा निर्णय घेण्यात आला.

लोकमान्य टिळक आणि डॉ.ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेली होमरूल लीग ही पहिल्या महायुद्धात भारतातील एक महत्त्वाची राष्ट्रवादी प्रतिक्रिया होती. पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला ब्रिटिश सरकारने भारताचाही युद्धात समावेश केला होता. ब्रिटनने भारतीयांच्या परवानगीशिवाय भारतीय मनुष्यबळ आणि संसाधनांचा युद्धात मोठ्या प्रमाणावर वापर केला. यामुळे भारतावरील राष्ट्रीय कर्ज 30% वाढले, ज्यामुळे भारतीय लोकांच्या त्रासात प्रचंड वाढ झाली. या सर्वांचा भारतीय राष्ट्रीय चळवळीवर बहुआयामी प्रभाव पडला. सुरुवातीला भारतीय राष्ट्रीय नेत्यांनी ब्रिटनच्या युद्ध प्रस्तावाचे स्वागत केले आणि त्याला व्यापक पाठिंबा दिला. या निष्ठेचे बक्षीस म्हणून ब्रिटिश सरकार त्यांची राजकीय सुधारणांची मागणी पूर्ण करेल या हेतूने हे केले गेले. भारतात हळूहळू जबाबदार सरकार स्थापन करणे हे ब्रिटनचे ध्येय असल्याचे ब्रिटिश सरकारने जाहीर केले. परंतु युद्धानंतर घोषित केलेल्या सुधारणांमुळे राजकारणी आणि जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली.

**बेळगावची मुंबई प्रांतिक परिषद:**

बेळगावच्या मुंबई प्रांतिक परिषदेचे अध्यक्षस्थान दादासाहेब खापर्डे यांनी भूषवले. या परिषदेस बापूजी अणे, मुंजे, जोसेफ बॅप्टीस्टा इत्यादी नेते उपस्थित होते. बेळगावच्या परिषदेस महात्मा गांधीही उपस्थित होते, ज्यामध्ये त्यांनी भाषणही केले. यावेळी जोसेफ बॅप्टीस्टा यांची निवड होमरूल लीगचे अध्यक्ष म्हणून केली गेली. तसेच चिटणीस म्हणून न. चि. केळकर व दुय्यम चिटणीस म्हणून दा. वि. गोखले यांची निवड करण्यात आली.

कॉंग्रेस व लीग यांनी होमरूलबाबतची संयुक्त योजना ठरलेल्या मुदतीत सादर न केल्याने सप्टेंबर 1916 मध्ये डॉ.ॲनी बेझंट यांनी ‘ऑल इंडिया होमरूल लीगची’ स्थापना केली. मात्र टिळकांशी त्यांची युती असल्याने कर्नाटक, महाराष्ट्र, मध्यप्रांत वऱ्हाड हे टिळकांचे बालेकिल्ले वगळून अन्य भागात कार्य करण्याचे त्यांनी ठरवले.

**होमरुलचा अर्थ :**

‘होमरुल’ म्हणजे स्वराज्यप्राप्ती होय. आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपण प्राप्त करुन घेणे म्हणजे होमरुल होय. होमरुलची चळवळ ही मूळात आयर्लंडधील लोकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी श्री. रेडमंड यांच्या नेतृत्त्वाखाली आयरिश लोकांनी सुरू केली होती. डॉ. ॲनी बेझंट याही जन्माने आयरिश होत्या. त्यांनी या चळवळीचे बारकाईने निरीक्षण केलेले होते. भारत व आयर्लंड या दोन देशांची राजकीय समस्या सारखीच असल्याने आयर्लंडप्रमाणे भारतातही होमरुल चळवळ सुरू केली तर भारतीय लोकांत जागृती निर्माण होईल असे बेझंट यांना वाटत होते.

डॉ.ॲनी बेझंट याचे शिक्षण इंग्लंड व जर्मनीत पूर्ण झाले. इंग्लंडधील आगपेट्यांच्या कारखान्यात काम करणाऱ्या स्त्रियांच्या हक्कासाठी त्यांनी चळवळ सुरू केली. सन 1893 मध्ये त्यांनी शिकागो येथील धर्म परिषदेत सहभाग घेतला. त्यावेळी स्वामी विवेकानंदानी केलेल्या भाषणामुळे त्या हिंदु धर्म व संस्कृतीकडे आकर्षित झाल्या. सन 1893 मध्ये बेझंट भारतात आल्या. भारतात आल्यानंतर सन 1893 ते 1912 या काळात थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य केले. प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी बनारस येथे ‘सेंट्रल हिंदू कॉलेज’ स्थापन केले. पुढे सन 1913 मध्ये त्यांनी कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले. राजकीय जीवनात कार्यरत असताना त्यांनी कॉंग्रेसकडे होमरुल चळवळ सुरू करावी अशी मागणी केली. परंतु कॉंग्रेसमधून त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. भारताला स्वराज्याचे हक्क मिळाले पाहिजेत अशी भूमिका घेऊन त्यांनी होमरूल लीगची स्थापना केली .

**होमरूल लीगची स्थापना :**

1915 मध्ये मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनामध्ये डॉ.ॲनी बेझंट यांनी होमरूल लीगचा प्रस्ताव मांडला होता. भारत युद्ध कार्यात ब्रिटिशांची करत असलेल्या मदतीच्या मोबदल्यात ब्रिटिश सरकारने भारतीयांना राजकीय अधिकार द्यावेत अशी त्यांची मागणी होती. परंतु होमरूल लीग ही राष्ट्रीय सभेला पूरक संघटना आहे ही मागणी नेमस्तानी फेटाळून लावली. लोकमान्य टिळकांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर टिळकांनी या चळवळीस पाठिंबा दर्शविला. शेवटी सप्टेंबर 1916 मध्ये डॉ.ॲनी बेझंट यांनी होमरूल लीग नावाची संघटना मद्रास येथे स्थापन केली. तत्पूर्वी 1 एप्रिल, 1916 रोजी लोकमान्य टिळकांनी पुणे येथे होमरूल लीगची स्थापना केली. अल्पावधीतच कलकत्ता, मद्रास, कानपूर व अलाहाबाद इत्यादी ठिकाणी होमरुल लीगच्या शाखा स्थापन झाल्या. मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू, चित्तरंजन दास, मदनमोहन मालवीय, भुलाभाई देसाई,

Dr. S. P. Kattimani History of Modern India

मोहम्मद अली जिना, तेज बहादूर सप्रू इत्यादी प्रमुख राष्ट्रवादी नेते लीगमध्ये सामील झाले. महत्त्वाच्या नेत्यांची स्थानिक शाखांच्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली.

होमरूल ही राष्ट्रीय कॉंग्रेसच्या विरोधी नसून पुरक अशी संघटना होती. तिचे ध्येयही स्वराज्य हेच होते. निशस्त्र प्रतिकार व असहकार या तत्त्वावर ही चळवळ होती. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य ही मागणी होमरूल लीग मार्फत लोकमान्य टिळकांनी केली होती. साम्राज्यांतर्गत स्वराज्या नंतर संपूर्ण स्वातंत्र्याचा टप्पा आहे असे त्यांचे मत होते.

**होमरुल चळवळ व लोकमान्य टिळक:**

लोकमान्य टिळकांची सन 1914 मध्ये मंडालेच्या तुरुंगातून सुटका केली. ब्रिटिश सरकार या काळात पहिल्या महायुद्धात गुंतलेले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ मंदावलेली होती. पहिल्या महायुद्धातील भारतीयांच्या सहकार्याबद्दल ब्रिटिशांकडून जास्तीत जास्त राजकीय हक्क मिळाले पाहिजे असे टिळकांना वाटत होते. राजकीय हक्काची मागणी करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळ अधिक गतीशील झाली पाहिजे व हे काम कॉंग्रेस अंतर्गत व्हावे असे टिळकांना वाटत होते. डॉ. बेझंट टिळकांच्या कॉंग्रेस प्रवेशाबाबत आग्रही होत्या, परंतु फिरोजशहा मेहतांच्या विरोधामुळे असे करणे शक्य झाले नाही. टिळकांना राष्ट्रीय चळवळ अधिक गतीमान करण्याची गरज वाटत असल्याने डॉ. बेझंट यांची ‘होमरुल’ची संकल्पना उचलून धरली. 28 एप्रिल 1916 रोजी बेळगाव येथे भरलेल्या बैठकीत ‘होमरुल लीग’ची स्थापना केल्याचे घोषित केले व त्याचे कार्यालय पुणे येथे ठेवले. जोसेफ बॉप्टीस्टा यांना लीगचे अध्यक्ष नेमले व न. चि. केळकर यांना सचिव म्हणून घोषित केले. दादासाहेब खापर्डे, डॉ. मुंजे, शि. ल. करंदीकर इत्यादी मंडळी या संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी होते.

बॅ. महमद अली जीना, शौकत अली यांच्यासारखे मोठे नेतेही या चळवळीत सामील झालेले होते. पश्चिम भारतात या चळवळीचा फार मोठा प्रसार झाला. जनतेच्या वाढत्या प्रक्षोभामुळे अस्वस्थ झालेल्या गव्हर्नर जनरलने भारतमंत्र्यास कळविले की, ‘‘इंग्लंडने भारतास स्वराज्य द्यावे अशी मागणी टिळक व बेझंट करत आहेत. त्यांचा जबरदस्त प्रभाव जनमानसावर पडत आहे. राष्ट्रीय चळवळीपासून दूर असणारे उच्चभ्रू देखील यास पाठिंबा देत आहेत. यावर एकच उपाय म्हणजे भारतास राजकीय अधिकार देण्याबाबतची घोषणा करणे होय.’’ लोकमान्य टिळकांनी डॉ. बेझंट बाई यांच्या सुटकेसाठी सत्याग्रह करणार असल्याचे कळल्यानंतर डॉ. बेझंट यांची सुटका करण्यात आली व वाढता असंतोष कमी करण्यासाठी मॉटेग्यू यांने 20 ऑगस्ट 1917 रोजी भारतास जबाबदार सरकार देण्याचे धोरण जाहीर केले.

**होमरूल चळवळीची उदिष्टे व कार्य:**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याला अधिक गतिमान करण्यासाठी त्यांच्यामध्ये राजकीय हक्काची व स्व:शासनाबाबतची जाणीव निर्माण करण्यासाठी देशभर प्रचार दौरे करणे, व्याख्यानाद्वारे जनमत निर्माण करणे ही उद्दिष्ट्ये होमरूल चळवळीच्या स्थापनेमागे होते. होमरूल लीगच्या स्थापनेनंतर त्याच्या अनेक शाखा देशभर व देशाच्या बाहेरही स्थापन झाल्या. लोकमान्य टिळकांनी मुंबई, कर्नाटक, विदर्भ व मध्य प्रांत हे कार्यक्षेत्र ठेवून दौरे केले. होमरुल संबंधी आपली भूमिका विशद करताना टिळक म्हणतात की, ‘‘होमरुल किंवा स्वराज्याचे तत्त्व 1906 सालीच कॉंग्रेसला मान्य झाले आहे. पण कॉंग्रेसचे अधिवेशन वर्षातून एकदा भरत असल्यामुळे या राष्ट्रीय ध्येयास व्यवस्थित रुप देऊन त्यासाठी जे प्रयत्न करावयास पाहिजेत, त्यासाठी कॉंग्रेसने अद्याप काही तजवीज केलेली नाही. ही तजवीज करणे हे होमरुल लीग किंवा हिंदी स्वराज्य संघाचे मुख्य काम होय. यात कॉंग्रेसला विरोध नाही, इतकेच नव्हे तर हिंदुस्थानातील निरनिराळया प्रांतात निरनिराळे स्वराज्य संघ निघाले तरी त्यांच्यामध्ये परस्पर विरोध होणे शक्य नाही.’’

डॉ. ॲनी बेझंट यांनी भारताला स्वराज्याचे हक्क मिळालेच पाहिजेत अशा स्वरुपाची परखड भूमिका आपल्या वृत्तपत्रातून मांडली. त्यांच्या मते होमरुल म्हणजे जबाबदार शासनपद्धती होय. टिळकांनी केसरी व मराठा या वृत्तपत्रातून होमरुल चळवळीचा प्रचार केला. सन 1916 मध्ये देशव्यापी दौरा काढून होमरुल संबंधी आपली भूमिका मांडण्याचे काम टिळकांनी केले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात सुशिक्षित वर्ग होमरुल चळवळीकडे आकर्षित झाला. सन 1916 मध्ये टिळकांनी स्थापन केलेल्या लीगचे 14000 सभासद होते तर ही संख्या सन 1917 मध्ये 33000 वर गेलेली होती. सन 1917 मध्ये लोकमान्य टिळकांनी होमरुल लीगचे नाशिक येथे अधिवेशन घेतले. या अधिवेशनानंतर लीगचे कार्यकर्ते संपूर्ण देशभर प्रचार व प्रसाराचे काम करु लागले. सर्वसामान्य माणसांपर्यंत होमरूल चळवळीद्वारे लोक जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न केले. जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी स्वराज्याची गरज प्रतिपादित केली. लोकांमध्ये आत्मविश्वास, राष्ट्रीयत्व व राष्ट्रप्रेम निर्माण करण्याचे काम होमरूल लीगने केले.

**होमरुल लीगचे परदेशातील कार्य:**

लोकमान्य टिळकांनी स्वत:च होमरुल चळवळीसाठी इंग्लंडला जाण्याचा निर्णय घेतला. लो. टिळक, न. चि. केळकर, दादासाहेब खापर्डे, बिपिनचंद्र पाल इत्यादी मंडळी इंग्लंडला जाण्यास निघाली. मात्र त्यांचे पासपोर्ट रद्द केल्याने परत यावे लागले. टिळकांनी यानंतरही हार न मानता लाला लजपतराय, एस. एस. हार्डीकर व के. डी. शास्त्री यांना अमेरिकेस पाठविले. या नेत्यांनी भारतीय होमरुल चळवळीची भूमिका अमेरिकन जनतेसमोर मांडली. सॅन फ्रांन्सिस्को येथे होमरुल लीगची शाखा स्थापन केली व भारतीय स्वराजाच्या प्रश्नासंदर्भात अमेरिकन जनतेचा विश्वास संपादण्यात यश मिळवले. परिणामी भारतीय होमरुल चळवळीला जागतिक स्वरुप येण्यास मदत झाली.

Dr. S. R. Katimani History of Modern India

**जोसेफ बॅप्टिस्टा व होमरुल चळवळ:**

लोकमान्य टिळकांचे विश्वासू सहकारी व होमरुल चळवळीचे खंदे पुरस्कर्ते म्हणून जोसेफ बॅप्टिस्टा ओळखले जातात. केंब्रिज विद्यापीठातून बॅप्टिस्टा यांनी कायद्याची पदवी घेतलेली होती. मूळचे हिंदू सारस्वत पठारे असलेल्या बॅप्टिस्टा यांच्या कुटूंबियांनी ख्रिश्चन धर्म स्विकारलेला होता. टिळकांच्या कार्यावर प्रभावित होऊन बॅप्टिस्टा टिळकांच्या कार्याकडे आकर्षित झाले. टिळकांचे राजकीय सल्लागार म्हणून त्यांची ओळख निर्माण झालेली होती. टिळकांनी होमरुल लीगची स्थापन केल्यानंतर जोसेफ बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. होमरुलचा प्रसार करण्यासाठी नंतर ते इंग्लंडला गेले. इंग्लंडध्ये भारतीय होमरुल चळवळीचे कार्य व प्रश्न इंग्लंडच्या पार्लमेंटपर्यंत पोहचवण्यात व पार्लमेंटच्या सदस्यांचा पाठिंबा मिळवण्यात त्यांना यश आले. जोसेफ बॅप्टिस्टा यांनी भारतीय मजूर चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. अखिल भारतीय मजूर संघाच्या स्थापनेमध्येही त्यांचा मोठा सहभाग होता. मजूर वर्गाचा प्रतिनिधी, मजूरांच्या प्रश्नाबद्दल आस्था असणारा नेता म्हणून त्यांची ओळख होती. मुंबईमधील मंजूर संघाचे ते अध्यक्ष होते. 'ईस्ट इंडिया' नावाचे मासिक त्यांनी सुरू केलेले होते. लो. टिळकांच्या मृत्युनंतर टिळक अनुयायांशी त्यांचे मतभेद झाल्याने त्यांनी सक्रिय राजकारणात फारसा सहभाग घेतला नाही.

**ब्रिटिशांची दडपशाही:**

भारत ही ब्रिटिशांची प्रमुख वसाहत असल्याने ब्रिटिश सरकार पहिल्या महायुद्धात गुंतलेले असतानाही होमरूल चळवळीद्वारे निर्माण झालेल्या असंतोषाला दडपण्याचे काम ब्रिटिशांनी केले. लोकमान्य टिळक यांच्यावर मुंबई सरकारने खटला दाखल केला. याच काळात डॉ. ॲनी बेझंट यांच्यावरही मद्रास सरकारने खटला दाखल केला. तसेच ॲनी बेझंट यांना मुंबईत येण्यास प्रतिबंध केला. बिपिनचंद्र पाल यांना पंजाब व दिल्ली येथे येण्यास प्रतिबंद केला. टिळकांच्यावर भरलेल्या खटल्यातून टिळक निर्दोष सुटले. परंतु ब्रिटिशांनी 15 जून 1917 रोजी ॲनी बेझंट व बी. पी. वाडिया यांना अटक केली. एस. सुब्रमण्यम यांनी निषेध म्हणून 'नाइटहूड' ही पदवी परत केली. त्यामुळे संपूर्ण देशात ब्रिटिशांविरोधी असंतोषाची भावना निर्माण झाली. लोकमान्य टिळक यातून निर्दोष सुटले. तसेच ॲनी बेझंट यांची सुटका न केल्यास सत्याग्रहास सुरुवात करण्यात येईल असा इशारा टिळकांनी दिल्यामुळे त्यांचीही मुक्तता करण्यात आली.

**होमरूल चळवळीचे परिणाम:**

होमरूल चळवळीस भारताप्रमाणेच परदेशातही यश मिळाले. विशेषतः अमेरिका व इंग्लंडधील उदारमतवादी नेत्यांनी व वर्तमानपत्रांनी होमरुल चळवळीस सहानुभूती दाखवली. तसेच मद्रास प्रांतातील होमरुल लीगचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी जून 1917 मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना पत्र पाठवून होमरुल चळवळीस मदत करण्याची विनंती केली. विल्सन यांनी जी युद्धतत्त्वे घोषित केलेली होती त्यामध्ये स्वयंनिर्णयाचे तत्त्व होते. या तत्त्वानुसार भारताचा स्वयंनिर्णयाचा प्रश्न सोडवावा अशी मागणी अय्यर यांनी केली. हे पत्र अनेक वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले. त्यामुळे संसदेत ब्रिटनच्या धोरणावर टीका झाली. जुलै 1917 मध्ये जोसेफ बॅप्टिस्टा यांच्या नेतृत्त्वाखाली एक शिष्टमंडळ इंग्लंडला पाठविले. या शिष्टमंडळाने इंग्लंडचा दौरा करुन भारतीय स्वराज्याचा प्रश्न ब्रिटिश जनतेपुढे मांडला. सन 1918 मध्ये टिळकांनी आणखी दोन शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवण्याचे ठरविले. परंतु त्यांच्यावर बंदी घालण्यात आल्याने ते जाऊ शकले नाही. लंडन व न्यूयॉर्क येथे होमरूलच्या शाखा काढण्यात आल्या होत्या. भारतामध्ये वाढत असलेला होमरूल चळवळीचा जोर आणि त्याचा परदेशामध्ये व प्रामुख्याने अमेरिकेमध्ये होत असलेला प्रचार पाहून ब्रिटिशांनी मुत्सद्देगिरीचा वापर केला व भारतीयांना जबाबदार शासनपद्धतीमध्ये राजकीय सुधारणा देण्याचे घोषित केले. तत्कालीन भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी 20 ऑगस्ट, 1917 रोजी असे घोषित केले की, आम्ही भारताला जबाबदार शासनपद्धती देणार आहोत. भारतीयांना सुधारणा देण्याचे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे असे घोषित करण्यात आले. थोडक्यात होमरूल चळवळीचे खालील काही परिणाम सांगता येतील .

- मवाळवादी नेते राजकारणापासून दूर फेकले गेले व जहालाचे वर्चस्व पुन्हा निर्माण झाले.
- भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सूत्रे होमरुलमुळे टिळकांच्या हातात आली.
- राष्ट्रीय सभेनेही ब्रिटिशाकडे स्वराज्याची मागणी करण्यास सुरुवात केली.
- होमरुल लीगने परदेशात केलेल्या कामाच्या परिणाम स्वरुप नॉटिंगहॅम परिषदेत मजूर पक्षाने भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे असा ठराव मंजूर केला.
- 20 ऑगस्ट 1917 मध्ये भारतमंत्री मॉटेग्युने भारतात जबाबदार सरकार देण्याचे ब्रिटिश शासनाचे धोरण जाहीर केले.

**होमरुल चळवळीच्या ऱ्हासाची कारणे:**

होमरुल चळवळीने अल्पावधीत आपला प्रभाव निर्माण केला व महत्त्वपूर्ण कामही केले, परंतु ही चळवळ फार काळ टिकू शकली नाही. त्यांची कारणे पुढीलप्रमाणे:

- होमरुल लीगने केलेली वसाहतीच्या स्वराज्याची मागणी जहाल तरुणांना मवाळ स्वरुपाची वाटत होती. त्यामुळे त्यांच्यात निराशा पसरली.

Dr. S. R. Katmani History of Modern India

- होमरुल चळवळीच्या शाखा फक्त भारतातील प्रमुख शहरामध्ये स्थापन झाल्या त्यामुळे ही चळवळ सर्वसामान्यापर्यंत पोहचली नाही.
- होमरुल चळवळीवर ब्राह्मणांचा प्रभाव आहे असा प्रचार झाला त्यामुळे बहुजन समाज या चळवळीपासून बाजूला राहिला.
- राष्ट्रीय सभेचा होमरुल चळवळीला विरोध होता.
- टिळकांच्या मृत्युनंतर महात्मा गांधीचा भारतीय राजकीय पटलावर उदय झाला. गांधीजींचे नेतृत्त्व व सत्याग्रहाचे तत्त्व यामुळे होमरुल चळवळ बाजूला गेली.

**मूल्यमापन :**

ब्रिटिशांनी दिलेल्या या राजकीय सुधारणांच्या घोषणेचे नेमस्त नेत्यांनी स्वागत केले व ब्रिटिशांना पाठिंबा दर्शविला. परंतु लोकमान्य टिळकांनी मात्र जबाबदार शासन पद्धतीच्या घोषणातील ब्रिटिशांचा फसवेपणा ओळखला होता. म्हणूनच पंडित मदन मोहन मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथील 1918 च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात ब्रिटिश पार्लमेंटला असे आवाहन करण्यात आले की, पार्लमेंटने कायदा करून भारताला वसाहतीचे स्वराज्य ताबडतोब द्यावे. अशाप्रकारे होमरूल चळवळीमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला एक व्यापक जनआंदोलन व ब्रिटिशांविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण करण्याचे एक साधन मिळाले.

होमरूल चळवळीचे सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे या चळवळीने गुजरात, सिंध प्रांत, मद्रास व मध्यप्रांत या राजकीय चळवळीचा प्रभाव कमी असणाऱ्या क्षेत्रात मोठी राजकीय जागृती घडवून आणत त्यांना राष्ट्रीय आंदोलनात समाविष्ट करून घेतले. थोडक्यात, होमरूल चळवळीने महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्यास मदत केली.

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील टिळकांचे कार्य:**

इंग्रजांनी दिलेल्या परदेशी शिक्षणामुळे भारतीयांमध्ये विज्ञानाचा प्रसार झाला. परंतु पारतंत्र्यामध्ये असलेल्या या भारतीयांमध्ये पारतंत्र्याबद्दल असंतोष निर्माण करून देशभक्तीचे स्फुल्लिंग त्यांच्या अंत:करणात निर्माण करण्याचे महान कार्य लोकमान्य टिळकांनी केले. केसरी या आपल्या वृत्तपत्राद्वारे अग्रलेख लिहून व अनेक ठिकाणी भाषणे करून लोकांमध्ये स्वाभिमान जागृत केला. “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच” अशी सिंहगर्जना करणारे बाळ / केशव गंगाधर टिळक यांचा जन्म 23 जुलै, 1856 रोजी रत्नागिरी येथे झाला. टिळकांचे वडील शिक्षक होते. घरची परिस्थिती साधारण होती. टिळक लहान असतानाच त्यांच्या आई-वडिलांचा मृत्यू झाला. 16 व्या वर्षी ते मॅट्रिक परीक्षा पास झाले. 1871 मध्ये टिळकांचा विवाह झाला. 1873 साली ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यास गेले. टिळक 1877 मध्ये बी. ए. व 1879 मध्ये एल. एल. बी. पास झाले. यानंतर चिपळूणकरानी स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते अध्यापनाचे कार्य करू लागले. लोकमान्य टिळकांच्या वर्तमानपत्रातील सत्य व निर्भीड विचारांच्या मांडणीमुळे सरकारने त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरून त्यांना तुरुंगात पाठवले.

**टिळकांचे स्वदेशीबाबतचे विचार :**

भारतात उत्पादित होणाऱ्या वस्तूंवर ब्रिटिश सरकारने एका बाजूला भारतातील वस्तूंवरील कर वाढवला तर दुसऱ्या बाजूला इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या वस्तूंवरील कर कमी केला. यावर उपाय म्हणून लोकमान्य टिळकांनी जनतेला देशी कापड व देशी वस्तू वापरण्याचे आवाहन केले. देशात ठिकठिकाणी याबाबतचे ठराव संमत करण्यात आले. टिळकांनी असे आवाहन केले की, ‘स्वदेशी वस्तू महागात पडल्या तरीही त्याच वापराव्यात, कारण त्यामुळे देशातील पैसा देशातच राहतो.’ अशाप्रकारे भारतातून इंग्लंडमध्ये जाणाऱ्या पैशाचा प्रचंड ओघ थांबवणे हा स्वदेशी चळवळी मागील मुख्य हेतू होता.

टिळकांनी स्वदेशीला नवा अर्थ दिला. केसरीमध्ये ते म्हणतात, “आपला देश हा एक विशाल वृक्ष आहे. स्वराज्य हा त्याचा बुंधा आहे आणि स्वदेशी व बहिष्कार या शाखा आहेत.” थोडक्यात ब्रिटिशांशी निगडीत असलेल्या सर्व गोष्टींवर बहिष्कार घालायचा आणि ब्रिटिशांच्या प्रतिष्ठेच्या मूळावर आघात करून तिच्याविषयाचे आकर्षण नष्ट करायचे. तसेच ब्रिटिश व्यापाऱ्यांनी चालवलेल्या शोषणाला व ब्रिटिश नोकरशाहीने चालवलेल्या जुलमाला विरोध करून त्यांना राज्यकारभार करणे अशक्य करून सोडायचे हा स्वदेशी मोहिमेचा हेतू होता.

**टिळकांचे स्वराज्याबाबतचे मत :**

स्वराज्य प्राप्ती ही भारतीय राष्ट्रवादाच्या विजयाची अंतिम पायरी आहे, हे लोकमान्य टिळकांनी अचूक पद्धतीने ओळखले होते. म्हणूनच इ. स. 1916 च्या काँग्रेसच्या लखनौ अधिवेशनामध्ये “स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच” अशी सिंहगर्जना त्यांनी केली. स्वराज्याकडे लोकमान्य टिळक राजकीय, नैतिक व आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहत होते. राजकीय दृष्टीकोनातून स्वराज्याचा अर्थ स्वशासन असा ते घेत होते, तर नैतिक दृष्टीकोनातून स्वराज्याची प्राप्ती म्हणजे स्वधर्म पाळण्याची शक्ती निर्माण होणे असे ते मानत. थोडक्यात टिळकांच्या मते, ‘स्वराज्य म्हणजे सुनियंत्रित वस्तूप्रमाणे स्वातंत्र्य’ असा अर्थ त्यांना अभिप्रेत होता. एकूणच नागरिक व शासन या दोघांनीही स्वधर्माचे म्हणजे कर्तव्याचे पालन करावयाचे ज्यातून स्वराज्याची निर्मिती होईल असा टिळकांचा दृष्टीकोन होता.

Dr. S. P. Kattimani History of Modern India

**टिळक व राष्ट्रीय शिक्षण :**

राष्ट्रीय शिक्षण हा टिळकांचा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा विषय होता. 1906 साली महाराष्ट्रामध्ये विद्या प्रसारक मंडळ स्थापन करण्यात आले होते. व त्या मंडळामार्फत कोल्हापूरमध्ये समर्थ विद्यालय सुरू करण्यात आले होते. पण तेथे चालणे अवघड आहे असे वाटल्याने हे विद्यालय विजापूरकर व टिळक यांनी पुण्याजवळील तळेगाव दाभाडे येथे हलवले.

इंग्रजांच्या शाळा व संस्थांमधून केवळ बाबू तयार केले जात असत. शिवाय त्यातून तयार होणारे विद्यार्थी आपल्या हक्कांविषयी व स्वातंत्र्याविषयी विशेष जागृत नसत. ही व्यवस्था बदलून देशाभिमान उत्पन्न करणाऱ्या आणि त्याच बरोबर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी व्यवसाय शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय वृत्तीच्या खाजगी शिक्षण संस्था स्थापन व्हाव्यात असे आवाहन लोकमान्य टिळकांनी केले.

**टिळकांचे मद्यपान विरोधी कार्य :**

मद्यपान निषेधासंबंधी आपली भूमिका समजावून देताना टिळक म्हणतात, "परकीय सरकार इकडे आले. त्याना वाटेल तर शिस्त- शांतता ठेवावी. पण आम्हाला नीती शिकवण्याच्या भानगडीत पडू नये. मध्यपान निषेध हा हिंदू लोकांचा एक विशेष नीतीतत्व आहे आणि तो अंमलात आणण्याच्या कामी लाभ घेण्याच्या दृष्टीने सरकारकडून मिळणारा अडथळा आपण मोडून काढला पाहिजे".

लोकमान्य टिळकांच्या मध्यपान निषेधाच्या आवाहनाला पुण्यातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आणि मद्यपान निषेधाची जोरदार चळवळ पुण्यात व इतरत्र सुरू झाली. 1907 साली पुण्यात 'मदयपान निषेधक सभा' स्थापन झाली. या सभेस टिळकांच्या बरोबर नेमस्त पक्षाचे गोखले व त्यांच्या अनुयायांचे ही सुदैवाने साहाय्य मिळाले, त्यामुळे मद्यपान बंदी चळवळीस जोर चढला.

**टिळक व मंडालेचा कारावास:**

30 एप्रिल, 1908 रोजी मुजफ्फरपुर येथे दोन बंगाली तरुणांनी बॉम्ब गोळयाचा प्रयोग केला, ज्यामध्ये दोन इंग्रज स्त्रिया ठार झाल्या. ब्रिटिश सरकारने प्रखर दडपशाहीचे सुरू केली. सरकारच्या या जुलमी धोरणावर कडक टीका करणारी लेखमालाच टिळकांनी 12 मे, 1908 च्या केसरीच्या अंकापासून सुरू केली. 'देशाचे दुर्दैव, दुहेरी इशारा, बॉम्ब गोळ्याचा खरा अर्थ, बॉम्बगोळ्याचे रहस्य, हे उपाय टिकाऊ नाहीत' इत्यादी लेखामध्ये टिळकांनी सरकारच्या सुलतानशाहीचे वाभाडे काढले. या लेखांच्या आधाराने टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून 24 जून, 1908 रोजी मुंबईत अटक केली दुसऱ्या दिवशी पुण्यामध्ये टिळकांच्या घराची झाडाझडती केली, पण त्यात आक्षेपार्ह असे काहीही आढळले नाही. 13 जुलै, 1908 रोजी हायकोर्टातील इतर खास दालनात टिळकांवरील राजद्रोहाचा खटला न्यायाधीश दावर यांच्या कोर्टात चालू झाला. यावेळी नेमलेल्या खास ज्यूरीत सात इंग्रज व दोन पारशी होते. यावरून या खटल्याचा निर्णय काय होणार हे अगोदरच सूचित झाले होते.

न्यायाधीशांनी वेगवेगळ्या तीन आरोपाखाली टिळकांना सहा वर्षांची सक्तमजुरीची हद्दपारी व हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. पोलिसांनी टिळकांना कोर्टातून मोठ्या बंदोबस्ताने कोर्टाबाहेर जमलेल्या लोकांची नजर चुकवून कुलाबा स्टेशन मध्ये नेले. तेथून त्यांना आगगाडीतून नेवून साबरमतीच्या तुरुंगात काही दिवस ठेवले, आणि त्यानंतर त्यांची ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात रवानगी केली. टिळकांच्या अटकेच्या, खटल्यासंबंधीचा असंतोष वारंवार लोकांकडून व्यक्त होत होता. 17 जुलैला 35 हजार गिरणी कामगारांनी हरताळ पाळला. 20 जुलैला दंगल करणाऱ्या जमावांवर पोलिसांना गोळीबार करावा लागला. टिळकांनी मात्र या मंडालेच्या कारावासात वाचन, चिंतन व लेखन अखंड चालू ठेवले. गीतारहस्य हा ग्रंथ कारावासात त्यांनी लिहून पूर्ण केला. शेवटी 16 जून 1914 रोजी टिळक शिक्षा संपवून पुण्यात परतले.

**ऐतिहासिक मूल्यमापन:**

लोकमान्य टिळक हे हिंदू धर्मशास्त्राचे पंडित होते. ते गणिततज्ञ, भाषातज्ञ, मुत्सदी राजकारणी व उत्कृष्ट संपादकही होते. वेदांचे प्राचीनत्व व आर्यांचे मूळ वसतीस्थान उत्तर ध्रुव ही आपली विचारसरणी त्यांनी 'आर्टिक होम इन वेदाज' व 'ओरायन' या दोन ग्रंथातून स्पष्ट केली आहे. मंडालेच्या तुरुंगातील सुप्त चिंतनातून त्यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. देवनागरी लिपीतील हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा असावी, अशी सूचना करणारे टिळक हे पहिले काँग्रेसचे पुढारी होत. त्यांनी केसरी व मराठा या वृत्तपत्राच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या राजकारणावर ताशेरे ओढले. ब्रिटिशांच्या अन्याय व शोषणाची माहिती देवून भारतीयांमध्ये ब्रिटिश सत्तेविषयी असंतोष निर्माण केला.

लोकमान्य टिळकांनी पुण्याच्या 'न्यू इंग्लिश स्कूल' च्या स्थापनेमध्ये आगरकर व चिपळूणकर यांच्यासमवेत योगदान दिले. गोपाळकृष्ण गोखलेंचे चरित्र लिहिणाऱ्या जॉन हायलंडने 'टिळक हिंसेचा व बंडखोर प्रवृत्तीचा अनुनय करीत होते' असा आरोप केला आहे. सर व्हॅलेंटाईन चिरोल या कट्टर टिळक विरोधकांनी त्यांना 'भारतातील असंतोषाचे जनक' असे विशेषण दिले होते. थोडक्यात, ब्रिटिशांच्या अन्यायी वर्तवणूकीबाबत जागरूकता निर्माण करून भारतामध्ये संघटित राष्ट्रवाद निर्माण करण्याचे काम टिळकांनी केले. ज्यामुळे महात्मा गांधीजीनी पुढील काळात उभारलेल्या असहकार चळवळीसाठीची पोषक परिस्थिती निर्माण झाली.

Dr. S. R. Katimani History of Modern India

| प्रश्न 1. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा. | | | | अचूक उत्तर |
|---|---|---|---|---|
| 1. 1921 साली मोपला बंड_______________ येथे झाले. | | | | |
| अ) मराठवाडा | ब) विदर्भ | क) तेलंगणा | ड) मलबार (केरळ ) | ड |
| 2. बाबा रामचंद्र यांनी शेतकऱ्यांचे संघटन_______________ येथे केले होते. | | | | |
| अ) अवध | ब) बिहार | क) आंध्र प्रदेश | ड) बंगाल | अ |
| 3. 1890 मध्ये स्थापन झालेली भारतातील पहिली ट्रेड युनियन (कामगार संघटना) बॉम्बे मिल हॅन्ड असोसिएशन्सची स्थापना _______________ नी केली. | | | | |
| अ) शशिपाल बॅनर्जी | ब) नारायण मेघाजी लोखंडे | क) मानवेंद्रनाथ रॉय | ड) एस. एम. जोशी | ब |
| 4. अहमदाबाद टेक्सटाइल लेबर असोसिएशन ATLA ची स्थापना यांनी केली होती | | | | |
| अ) व्ही. व्ही. गिरी | ब) महात्मा गांधी | क) एन. एम. जोशी | ड) मृदुला साराभाई | ब |
| 5. 1908 च्या मुस्लीम लीगच्या स्थायी अध्यक्षाच्या रूपात कोणास निवडले होते ? | | | | |
| अ) सर आगाखान | ब) सय्यद अमीर अली | क) सय्यद अहमद खान | ड) नवाब सलीमुल्ला | अ |
| 6. _______________ या कवीने 1917 च्या रशियन राज्यक्रांतीची प्रशंसा करणाऱ्या कविता लिहिल्या होत्या. | | | | |
| अ) रवींद्रनाथ टागोर | ब) सरोजिनी नायडू | क) मोहम्मद इक्बाल | ड) सुब्रमण्यम भारती | ड |
| 7. शांतीनिकेतनची स्थापना _______________यांनी केली. | | | | |
| अ) लाला हंसराज | ब) अरविंद घोष | क) रवींद्रनाथ टागोर | ड) महात्मा गांधी | क |
| 8. न्याय व्यवस्थेतील वांशिक भेदभाव नष्ट करणारे_______________ बिल होते. | | | | |
| अ) घटनात्मक | ब) इल्बर्ट | क) सनदी | ड) हंटर | ब |
| 9. लोकमान्य टिळकांनी मांडलेल्या चतुसूत्री मध्ये_______________ चा समावेश होता. | | | | |
| अ) स्वराज्य व स्वदेशी | ब) बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण | क) वरील दोन्ही | ड) यापैकी नाही | क |
| 10. 1893 साली जागतिक धर्म परिषद_______________ येथे भरली होती. | | | | |
| अ) दिल्ली | ब) पॅरिस | क) शिकागो | ड) लंडन | ड |
| 11. बंगालच्या फाळणीची योजना 1903 साली _______________याने तयार केली. | | | | |
| अ) सर फ्रेझर | ब) अलेक्झांडर | क) मॅकडोनाल्ड | ड) ग्रँट डफ | अ |
| 12. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी लोकमान्य टिळकांच्या नावे _____________ हा फंड उभारला गेला. | | | | |
| अ) स्वराज्य फंड | ब) बहिष्कार फंड | क) स्वातंत्र्य फंड | ड) यापैकी नाही | अ |
| 13. गीतारहस्य हा ग्रंथ_______________ यांनी लिहिला. | | | | |
| अ) स्वामी विवेकानंद | ब) नामदार गोखले | क) लोकमान्य टिळक | ड) दयानंद सरस्वती | क |
| 14. महाराष्ट्रात सर्वप्रथम सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंतीची सुरुवात कोणी केली? | | | | |
| अ) लोकमान्य टिळक | ब) स्वातंत्र्यवीर सावरकर | क) गो. ग. आगरकर | ड) भाऊ दाजी लाड | अ |
| 15. लोकमान्य टिळकांना सहा वर्षे_______________ तुरुंगात ठेवले होते. | | | | |
| अ) मुंबई | ब) येरवडा | क) रंगून | ड) मंडाले | ड |
| 17. 'पंजाब केसरी' ही उपाधी कोणाला दिली गेली होती? | | | | |
| अ) टिपू सुलतान | ब) रणजीत सिंह | क) लाला लजपतराय | ड) भगतसिंग | क |
| 18. केसरी व मराठा या वृत्तपत्राचे संपादक म्हणून _____________ यांनी कार्य केले. | | | | |
| अ) बाळशास्त्री जांभेकर | ब) दादाभाई नौरोजी | क) भाऊ दाजी लाड | ड) लोकमान्य टिळक | ड |
| 19. आर्क्टिक होम ऑफ द वेदाज या ग्रंथाचे लेखन कोणी केले? | | | | |
| अ) स्वामी विवेकानंद | ब) नामदार गोखले | क) लोकमान्य टिळक | ड) दयानंद सरस्वती | क |
| 20. 1907 साली काँग्रेसचे अधिवेशन कोठे झाले? | | | | |
| अ) बंगाल | ब) पंजाब | क) सुरत | ड) मुंबई | क |
| 21. _______________ मध्ये लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक शिवजयंती साजरी करण्यास सुरुवात केली. | | | | |
| अ) 1891 | ब) 1890 | क) 1899 | ड) 1895 | ड |
| 22. भारतीय विद्यापीठ कायदा कधी पारित करण्यात आला? | | | | |
| अ) 1904 | ब) 1919 | क) 1870 | ड) 1885 | अ |
| 23. कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉलेजचे प्राचार्य _____________ हे होते. | | | | |
| अ) बिपिनचंद्र पाल | ब) अरविंद घोष | क) रवींद्रनाथ टागोर | ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी | ब |
| 24. अल-हिलाल वृत्तपत्राचे संपादक कोण होते? | | | | |

Dr. C. R. Kattimani History of Modern India

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) मझहर उल हक | ब) मौलाना मोहम्मद अली | क) हसन इमाम | ड) मौलाना अबुल कलाम आझाद | ड |
| 25. कॉम्रेड पत्राचे संस्थापक_________________ हे होते. | | | | |
| अ) अबुल कलाम आझाद | ब) मौलाना मोहम्मद अली | क) हसन इमाम | ड) सय्यद अहमद खान | ब |
| 26. भारतीय कायदे सहिंतिचे जनक म्हणून _________________ यांना ओळखले जाते. | | | | |
| अ) लॉर्ड विलिंग्डन | ब) लॉर्ड कर्जन | क) सम्राट अकबर | ड) लॉर्ड मेकॉले | ड |

**प्रश्न 2 . खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

1. काँग्रेसमधील जहालवादाच्या उदयाची कारणमीमांसा स्पष्ट करा.
2. 1905 ते 1920 या काळातील जहालवाद्यांच्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील ऐतिहासिक कामगिरीचे मूल्यमापन करा.
3. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील होमरूल चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1. टिळकांची चतुसूत्री

2. जहालवादी विचारसरणी

3. सुरत येथील राष्ट्रीय काँग्रेसमधील फुट

4. बंगालची फाळणी व वंगभंग आंदोलन

Dr. S. R. Kattimani History of Modern India